महाराष्ट्र शासन

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पालघर, जिल्हा पालघर यांचे कार्यालय

**पार्श्वनाथ ९ इमारत, बिडको नाका,**
**नवली, ता.पालघर, जिल्हा-पालघर**

**दुरध्वनी क्रमांक ०२५२५-२५३१११**
**Email ID : collectorpalghar@gmail.com**

**वाचले:-**

१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ३४ व ५१ (b)
२) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र/करोना-२०२०/ प्र.क्र.५८/ आरोग्य ५ दि.१४/०३/२०२०.
३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.
४) सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय मुंबई यांचेकडील करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेली अधिसुचना क्र/करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४/०३/२०२०.

जिल्हाधिकारी पालघर
जिल्हा पालघर

क्र/जि.आ.व्य.पालघर/कोरोना विषाणू/हॉटेलबंद/आदेश/कावि- २०८ /२०     दि.१४/०३/२०२०

**आदेश**

ज्याअर्थी उपोद्घातातील अ.क्र.२ अन्वये मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे. करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून जिल्हयाच्या कार्यक्षेत्रातील नागरिकांचे आगमन व प्रस्थान प्रतिबंधीत करण्याबाबत आवश्यक आहे. पालघर जिल्हयामध्ये केळवा, माहिम, सातपाटी, अर्नाळा, डहाणू, बोर्डी, जव्हार, वाडा इत्यादी गावामध्ये/शहरामध्ये पर्यटकांची उपस्थिती मोठया प्रमाणावर दिसून येते. राज्य शासनाने उपोद्घातातील अ.क्र.४ अन्वये आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी सक्षम प्राधिकारी यांना प्राधिकृत केलेले आहे.

आणि ज्याअर्थी उपोद्घातातील अ.क्र.४ मधील शासन अधिसुचनेनुसार जिल्हाधिकारी पालघर यांना पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

त्याअर्थी मी **डॉ.कैलास बा. शिंदे, जिल्हाधिकारी पालघर तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पालघर** मला आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ३४ व उपोद्घातातील अ.क्र.४ अन्वये शासन अधिसुचनेनुसार मला पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून निर्गमित केलेल्या अधिकाराचा वापर करुन पालघर जिल्हयाच्या **कार्यक्षेत्रातील सर्व हॉटेल व त्याअनुषंगाने येणाऱ्या आस्थापनांच्या कार्यक्षेत्रात नागरीकांचे आगमन व प्रस्थान दि.१४/०३/२०२० ते दि.३१/०३/२०२० पर्यंत प्रतिबंधीत करण्याचे आदेश देत आहे.**

उक्त आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी. सदरहू आदेशाची अंमलबजावणी करण्यास संबंधितांनी टाळाटाळ केल्यास अथवा विरोध दर्शविल्यास संबंधितांचे विरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील ५१ (b) व भारतीय दंड संहिता (४५ ऑफ १८६०) च्या कलम १८८ नुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदरचा आदेश आज दि.१४/०३/२०२० रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.

जिल्हाधिकारी पालघर
जिल्हा पालघर

**सही/--**
**(डॉ.कैलास बा.शिंदे)**
**जिल्हाधिकारी पालघर तथा**
**अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन**
**प्राधिकरण, पालघर**

४८

प्रत:-

१) मा.अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.

२) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार कॉम्प्लेक्स बिल्डींग, नवीन मंत्रालय, मुंबई-४००००१ यांना माहितीसाठी सविनय सादर.

३) मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.

४) आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

५) पोलीस अधीक्षक पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

७) उपविभागीय अधिकारी वसई/पालघर/डहाणू/जव्हार/वाडा यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

८) तहसीलदार वसई/पालघर/डहाणू/तलासरी/मोखाडा/जव्हार/विक्रमगड/वाडा यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

९) जिल्हा शल्य चिकित्सक पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

१०) जिल्हा क्रिडा अधिकारी पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

११) शिक्षणाधिकारी, (प्राथमिक/माध्यमिक) यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

१२) मुख्याधिकारी, नगरपरीषद पालघर/डहाणू/जव्हार यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

१३) मुख्याधिकारी, नगरपंचायत वाडा/विक्रमगड/तलासरी/मोखाडा यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

१४) जिल्हा महिती अधिकारी पालघर यांना आवश्यक त्या प्रसिध्दीकरीता.

१५) पोलीस निरीक्षक (सर्व) यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

जिल्हाधिकारी पालघर (seal) जिल्हा पालघर

**जिल्हाधिकारी पालघर तथा**
**अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन**
**प्राधिकरण, पालघर**